**साहित्य**

# वेगळ्या धाटणीची कादंबरी

बाळासाहेब केंदळे

मराठी कादंबरीच्या इतिहासातील अलीकडच्या काळात प्रसिद्ध झालेली आयकर आयुक्त संग्राम गायकवाड यांची संहिता आणि अभिव्यक्तीच्या दृष्टीने वेगळ्या धाटणीची आटपाट देशातील गोष्टी ही कादंबरी वाचकांचे लक्ष्य वेधून घेत आहे.

साहित्य निर्मिती प्रक्रियेत साहित्याच्या वर्ण्य विषयासाठी ऐतिहासिक पार्श्वभूमी महत्त्वाची भूमिका पार पाडत असते. हे साहित्य आस्वादक, जुना इतिहासवाद मान्य करते. त्यामुळे साहित्याकडे पहाताना मुद्दामच त्यांची निर्मिती कोणत्या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर झाली व त्यातील वर्ण्य विषयाला कोण कोणती ऐतिहासिक घटिते कारणीभूत आहेत हे साहित्याच्या आस्वादक समिक्षेतून समजते. नवीन इतिहासवाद जे जे काही नवीन साहित्य निर्माण होते ते सर्व सामाजिक शास्त्राच्या दृष्टीने उपयुक्त आहे व त्याचा दर्जा हा बौद्धिक वैचारिक साहित्याच्या दर्जाचा असतो असे मान्य करते. सर्व काही साहित्यकृतीत असते व त्याच्या बाहेर काहीच नसते असे देरिदा म्हणतो त्यामुळे वाङ्मयीन व ऐतिहासिक संदर्भ एकाचवेळेस साहित्यकृतीत दिसतात याचा अनुभव संग्राम गायकवाड यांच्या कादंबरीतून येतो. कादंबरीत आपल्याला नोकरशाहीतील नियम संघटन कार्य पद्धती यांचा सैद्धान्तिक परिचय होतो. मानवी स्वभाव, मानवी संबंध, विविध मानवी मनोव्यापार यांचे विविध पातळ्यांवरील दर्शन या कादंबरीतून होते.

ही कादंबरी निमशहरी निम्न मध्यमवर्गाचे प्रतिनिधित्व करणारी असून ध्येयवादी समवयस्क विचारी मित्रांच्या कहाण्या चित्रित करतांना या मित्रांचा उच्च मध्यम वर्गापर्यंत झालेला प्रवास रेखाटताना विविध पातळ्यांवर झालेली स्थित्यंतरे प्रत्ययकारी पद्धतीने चित्रित करते. ही संक्रमणे ग्रामीण-निमशहरी-शहरी, निम्नमध्यमवर्गीय ते मध्यमवर्गीय अशी भौतिक आणि मानसिक पातळीवरील संक्रमणे त्यातील विविध ताण वाचकांना विचार करायला लावत त्याची अनुभूती वाचकांना देते. मुळात कादंबरीचा नायक स्वत: घट्टपणे अंतर्मनात खोलवर आदर्श मुल्ये कवटाळून ठेवत आहे. बाह्य जग आणि बाह्य परिस्थिती ही व्यवहारी व भ्रष्ट आहे याची जाणीव त्याला आहे. अनेक वेळा कधी जवळचे नातेवाईक तर कधी चालबाज व्यक्ती कशा प्रकारे मुल्यांची वाट लावतात व नायकही कधी कधी नाते सबंधापुढे तडजोड करू पाहतो आहे. पण ऐनवेळी त्याची संवेदना त्याला तसे करू देत नाही हे कादंबरीतून जाणवत राहते.

कादंबरी एका आयकर धाडीच्या निमित्तने असंख्य माणसे, त्यांच्या

लेखक अमृतेश्वर कॉलेज, विंझर, ता. वेल्हे, जि. पुणे येथे इतिहासाचे सहयोगी प्राध्यापक आहेत.

ईमेल- kendalethebala09@gmail.com

भोवतीचे पर्यावरण, या माणसांच्या विविध तऱ्हा, कादंबरीचा नायक निवृत्तीच्या माध्यमातून अनेक सूक्ष्म तपशील वर्णन करत मानवी नाती, माणूस आणि समाज, मानवी आदर्श आणि नाते संबंध, व्यावसायिकता आणि कौटुंबिक कर्तव्य, शहरी वास्तव्य आणि ग्रामीण भागातील गोतावळा यांचे विविध ताण यांची अनुभूती देते.

खर तर मध्यवर्ती कथानक सुरू करण्यापूर्वी आणि कथानक पुढे नेत असताना नायकाचा त्याच्या मित्र, नातेवाईक, व्यावसायिक सहयोगी कर्मचाऱ्यांचा फारच मोठा अवकाश त्याच्या फार मोठ्या कालखंडासह लेखकाने लीलया वाचकांच्या कवेत आणून ठेवला आहे. असंख्य व्यक्ती, त्यांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोण, त्यांचे वास्तवातील जगणे लेखकाने उलगडून दाखवण्याचा प्रयत्न केलेला आहे.

नोकरशाही प्रसंगी किती सुस्त व अघळपघळ असते व प्रसंगी ती किती कार्यक्षम होऊ शकते तसेच तिची परिणामकारकता तसेच मर्मग्राही आघात करण्याची क्षमताही दाखवून देते. आयकर खात्यातील अनुभवानुसार विशिष्ट मनोव्यापारात्मक कौशल्य प्राप्त केलेले, आकडेमोड, आर्थिक गुन्हे शोधण्याच्या विविध पद्धती विकसित केलेले, व्यावसायिक गुप्तता पाळणारे, मानसिक दबाव तंत्र वापरून आर्थिक उलाढाली करचुकवेगिरी करणाऱ्यांनी रकमा कशा प्रकारे फिरवल्या असाव्यात, हिशोबलेखनात कोणत्या खुब्या वापरल्या असाव्यात, त्या कशा शोधून काढाव्यात, कशा प्रकारे संवाद साधत समोरच्याला बोलते करावे, या सगळ्या क्लृप्त्या व व्यावसायिक कौशल्य असलेले अधिकारी कसे घडतात व त्यांची कार्ये पार पाडतात याचा प्रत्यक्ष अनुभव या कादंबरीतून वाचकाला मिळतो. नोकरशाहीत सर्व नियम कार्यप्रणाली यांचे सविस्तर नियम वर्णन केलेले असतात हे सिद्धान्कनाच्या पातळीवर ठीक वाटले तरी आवश्यकतेनुसार ती योग्य मनुष्यबळ शोधते, प्रसंगी नियमाला बगल देत अपेक्षित साध्य नियमांची चौकट पार करून साध्य करते हे कादंबरीतून दिसते. नोकरशाही ही संबंधित विषयाचे ज्ञान, समस्येची योग्य उकल व त्यावरील उपाययोजना व कार्यवाही अशा व्यावसायिक कौशल्यासाठी ओळखली जाते, त्यामुळे वेबरने तिला आधुनिक काळातील व्यवस्थापन कलेतील उत्कृष्ट संघटन असे संबोधिले आहे. तसेच नोकरशाही अधिसत्त कायदेशीर व व्यवहारवादी विवेकी अधिसत्त आहे. या अधिसत्तेला लोकांची अधिमान्यता आहे. आधुनिक लोकशाहीला ती आवश्यक आहे असे वेबरचे चिंतन होते. या व्यवस्थेत अधिकार व अधिसत्तेचे परिचालन योग्य प्रकारे होते असे आधुनिक सिद्धान्त मानतात. वेबरच्या या विश्लेषणाचा प्रत्यय कादंबरीतून जाणवत राहतो. ही व्यवस्था किती प्रकारे आणि किती सूक्ष्म रीतीने कितीही प्रभावशाली असलेल्या व्यक्तीला कशा प्रकारे उत्तरदायी आणि जबाबदार ठरवते हे कादंबरीतून दिसते.

कादंबरीला एक उपकथानक असून हे कथानक मुख्य कथानकाला येऊन मिळते. यात सोनमोर नावाच्या दुर्मिळ व ज्याचे अस्तित्व धोक्यात आहे अशा पक्षाच्या प्रजातिच्या शिकारीवरुन नायकाच्या मित्राच्या भावाच्या अटकेचा प्रसंग असून या निमित्तने अनेक वादविषय चर्चिले गेले आहेत. यात समकालीन तत्त्व संबंधांच्या जाळ्यातून सत्तेची रचना होते जे फुकोने वर्णन केले आहे ते कादंबरीतून ठिकठिकाणी जाणवते. ते मुख्य कथानकातील विजय मोहरे या पात्राच्या निमित्तने जाणवते तर उपकथानकात ते मल्हार साहेबराव व निवृत्ति यांच्या संबंधातूनही जाणवत राहते. विजय मोहरेला परमसंगणक संबोधून संबंधाची जाळी तो निर्माण करून प्रभावी सत्त व त्यातून आर्थिक साम्राज्य कशा प्रकारे निर्माण करतो हे वर्णन केले आहे. यातून एक प्रकारे फुकोचा सत्त सिद्धांत दृष्टिक्षेपात येतो. संस्थातून सत्त निर्माण होत नसते तर संबधांच्या जाळ्यातून सत्त व संस्था निर्माण होतात याची प्रचिती येते. उपकथानकात पर्यावरणवादी चळवळी किती हस्तक्षेप

करू शकतात व शासन यंत्रणेवर प्रभाव टाकू शकतात ते समजते. कायद्याचे राज्य व्यक्तीला व संस्थांना कशा प्रकारे उत्तरदायी बनवू शकते याचा चांगलाच प्रत्यय येतो. एकप्रकारे ते जोर का झटका धीरेसे देत असते. लोकशाही शासन प्रणालीत व्यक्तीची सहमती घेऊन त्याला कायद्याच्या कक्षेत आणून उत्तरदायी बनविणे, जबाबदार बनविणे महत्त्वाचे असते. कादंबरीतील मुख्य व उपकथानक हे प्रकर्षाने समोर आणते. कथानकात विजय मोहरे किंवा साहेबराव यांच्यावर प्रत्यक्षात काही कारवाई झालेली नाही. परंतु त्याना उत्तरदायी बनवून त्यांच्यावर त्याचे किती भयानक परिणाम होऊ शकतात त्याची सुरुवात कथानकात आहे. त्यामुळे काहीही रोमहर्षक होत नाही. काळ्या पैशांच्या आधारावर धनिक झालेले ठेचले जात नाहीत असे वाटते. परंतु त्यांचे ठेचणे खरं तर नंतर सुरू होणार असते. राजकीय नेते, नोकरशाही, निवडणुका यांची अनिष्ट युती ही कादंबरी अधोरेखित करते.

या कथानकातील संख्येने अधिक पात्रे ही मध्यमवर्गीय व उच्च मध्यमवर्गीय जाणिवा असलेली व तोच अनुभव प्रकट करणारी आहेत. नायक व त्याचे सहकारी कधी भारावून, कधी राष्ट्रीय भावनेतून कसलीही तडजोड न करता आपण फार मोठे कार्य पार पाडत आहोत हा अविर्भाव या कथानकात दिसतो. वास्तवात आयकर खात्यात असे काही अधिकारी कार्यरत असावेत. नाही तर गाजलेल्या आयकर धाडी हे एक फिक्शनच आहे असे वाटले असते.

ग्रामीण शेतकरी कुटुंबाची पार्श्वभूमी असलेला अधिकारी काळाच्या ओघात ग्रामीण गोतावाळा व स्वत:च्या गावापासून कशाप्रकारे अलिप्त बनत जातो, महत्त्वाच्या कौटुंबिक सुखदु:खाच्या कार्यक्रमांना हजर राहावे ही अपेक्षा तो पूर्ण करू शकत नाही. परंतु अधिकाऱ्यांची वैयक्तिक तसेच व्यासायिक संबंधातून जी साखळी निर्माण होते ती किती परिणामकारक असते हेही या कादंबरीतून निदर्शनास येते. एकाच वेळेस नायकाला आपल्या बालपणाच्या जैविक पर्यावरणाचा नोस्टाल्जिया आहे तर या पर्यावरणातील बदल त्याला खिन्नताही आणताना दिसतात.

कादंबरीत अनेक विषयांवर बौद्धिक चर्चा वेगवेगळ्या प्रसंगांच्या निमित्ताने आल्या आहेत. यात मानवशास्त्र, समाजशास्त्र, मानसशास्त्र असे अनेक विषय येतात. नेशन स्टेट, खाजगी अवकाश - सार्वजानिक आवकाश, कम्युनिटी आणि असोसिएशन संकल्पनांची तपशीलात चर्चा होते.

स्वातंत्र्यानंतरच्या पन्नास वर्षात ग्रामीण शेतकरी कुटुंबे कोणत्या दिशेने वाटचाल करत गेली, शेती, शेतीचे पर्यवरण अवर्षणप्रवण भागातील परिसंस्था, त्याच्या समस्या, कोरडवाहू शेती, ग्रामीण भागातील शिक्षणाचा प्रसार, शेतकरी कुटुंबातील कर्तबगार न निघालेल्या व्यक्तींची वाताहत इत्यादी समस्या या कादंबरीत आल्या आहेत.

कादंबरीत मध्यमवर्गाला अलीकडे भेडसवणारी हृदयरोगाची समस्या आलेली आहे. तसेच स्मशानभूमीत मृत हृदयरोग्याची स्टेंट जमा करून त्यावर उदरनिर्वाह करणाऱ्या व्यक्तीची कथाही वर्णन केली आहे. त्यानिमित्तने वैद्यकीय व्यवसायिकांवरील आयकर धाडीच्या कथाही आल्या आहेत.

लेखकाला त्याचे बहुविध अनुभवविश्व अभिव्यक्त करायचे आहे. ते वास्तव आहे. प्रत्यक्षातील हा अनुभव व्यक्त करताना नोकरशाहीतील संकेतानुसार अनेक अडचणीना सामोरे जावे लागले असते. तसेच प्रत्यक्ष नोकरशाहीत कार्यरत असलेल्या पात्रांना अडचणी आल्या असत्या. त्याचबरोबर लेखनाच्या व अभिव्यक्तीच्या स्वातंत्र्यावर मर्यादा आल्या असत्या या बाबींची चर्चा लेखकाने मनोगतात केली आहे.

लेखकाने आपण या कादंबरीसाठी फक्त फिक्शनचा फॉर्म निवडला आहे हे स्पष्ट करताना सरकारी सेवेत असताना कसल्याही प्रकारचे वादंग निर्माण होऊ नये व इतर प्रकारच्या अडचणी निर्माण होऊ नयेत असे

हेतु स्पष्ट केले आहेत. परंतु हे करत असताना व्यक्तींना, प्रदेशांना व शहरांना प्राचीन भारतीय व संस्कृत नावे दिली आहेत. त्यामुळे एकप्रकारे एकाच वेळेस ऐतिहासिक तसेच विडंबनात्मक व्यत्यास निर्माण करत वास्तव चित्रण केलेले आहे. या फॉर्ममुळे प्रत्यक्षात अस्सल जीवनानुभव व्यक्त करतानाही कसल्याही प्रकारे शासकीय नियमांची अड्चण निर्माण न होता व्यक्त करणे साध्य झाले आहे. उदा. पंकजपर्ण, अश्मक देश, धेनुकाकट, आटपाट इत्यादि. ऐतिहासिक वातावरण निर्मिती करून व्यंगात्मक शैलीचा वापर करत वेगळी वातावरण निर्मिती केली आहे. ज्या ज्या ठिकाणी अलिप्त राहून संयत पद्धतीने निवेदन आवश्यक आहे त्या ठिकाणी अतिशय तटस्थ चित्रण आले आहे. ज्या ठिकाणी धारदार प्रवाही भाषा आवश्यक आहे त्या ठिकाणी प्रत्ययकारी पद्धतीने भाषा टोकदार झाली आहे. विशेषत: विजय मोहरेचे वर्णन पाहता येते.

अनेक ठिकाणी ग्रामीण बोलीचा वापर करण्याचा प्रयत्न लेखकाने केलेला आहे. पण फक्त काही ठिकाणी हा प्रयत्न यशस्वी झालेला आहे. निवेदन आणि संवाद दोन्ही बोली आणि प्रादेशिक भाषेत असावेत असा या पूर्वी मराठी साहित्यिकांचा प्रयत्न राहिला आहे, लेखकाला याची जाणीव आहे. परंतु हा प्रयत्न तितका यशस्वी झाल्यासारखा वाटत नाही. ●

---

**आटपाट देशातल्या गोष्टी**, संग्राम गायकवाड, २०१८, मनोविकास प्रकाशन, पुणे, पृ. २६७, मूल्य ३५० रु.


'परिवर्तनाचा वाटसरू'च्या कार्यालयीन
कामाकरिता संपर्क

**शुभम जाधव**

भ्र. ७०२८२०२०९२


## आर्टिकल १५... (पान नं ४५ वरून)

तयार करणारा आयन रंजन किंवा मग सरते शेवटी सस्पेंड होऊनही पूजाच्या शोधासाठी सुअर तलावाच्या दलदलीत उतरताना 'ब्राम्हण को भी तो एक न एक दिन उतरना ही पडेगा' असं म्हणत ती दलदल पार करणारा आयन रंजन हे इथल्या सडक्या जातीय मानसिकतेच्या कचऱ्याहून पलीकडे जाणाऱ्या, भेदभावाची दलदल पार करणाऱ्या मानवतावादी तरुणाचे प्रतीक आहे. कोणत्याही जातीचे नव्हे तर 'मानवजातीचे' प्रतिनिधित्व करणारा असा हा आयन रंजन फक्त ब्राम्हणच नव्हे तर सर्वच जातीतून निर्माण झाला तर 'शतकानुशतके तुंबलेली ही विषमतेची आणि जातिव्यवस्थेची दलदल' नक्कीच नष्ट होईल, हा संदेश देणारा हा 'हिरो' म्हणूनच खऱ्या अर्थाने 'हिरो' ठरला. गोराच्या रूपाने हिंमतीने उभी राहणारी दलित कार्यकर्ती स्त्री, निषाद हा आंबेडकरी विचारांचा धगधगता अंगार असलेला पण तरीही व्यवस्थेपुढे हतबल झालेला तरुण हे या चित्रपटाचे खरे यश आहे. पोस्टमार्टेम रिपोर्ट बदलण्यासाठी दबाव आणणारी भ्रष्ट पोलीस यंत्रणा, गुन्हेगाराला राजकीय अभय देणारे मंत्री आणि ज्यांच्याकडून सामान्य माणूस न्यायाची अपेक्षा करतो त्या सीबीआयचा पक्षपाती चेहरा या चित्रपटातून समोर आणला गेला आहे. चित्रपटाच्या सुरुवातीला केलेल्या डिक्लेरेशनमध्ये 'हा चित्रपट काल्पनिक घटनेवर आधारित आहे' असे कितीही सांगितले तरी 'हा चित्रपट सत्य घटनेवर आधारित आहे' याच विचाराने चित्रपट पाहिला जातो. आणि हेच या चित्रपटाचे खरे यश आहे. आपण कोणत्या जातीचे, धर्माचे आहात यापेक्षा माणूस म्हणून स्वतः स्वतःशी जे जे प्रामाणिक आहेत, जे पुरोगामी आणि परिवर्तनवादी आहेत, जे संवेदनशील आहेत आणि जे हे सगळं बदलू इच्छितात त्यानी आर्टिकल १५ अवश्य पहावा. ●